| ९ | गंगाखेड | ०१ | — | ०२ | ०५ | ०८ | ०१ | — | ०१ | ०२ | ०४ |
| | एकुण | ०७ | — | १७ | ४३ | ६७ | ०५ | ०१ | ११ | २० | ३७ |

## ग्रामपंचायतीची माहिती तालुका आणि पंचायत नुसार

| अनु. क्र. | पंचायत समितीचे नाव | ग्रामपंचायत संख्या | खुला | महिला | ओ.बी. सी. | एस. सी. | एस. टी | ओ.बी. सी. | सर्वसाधारण | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | परभणी | ११७ | ४१३ | २८७ | १७७ | ५१ | ०७ | ०२ | ०३ | ०७ |
| २ | पाथरी | ४९ | १७५ | ७४ | ८७ | ४८ | ०२ | ०२ | ०४ | ०७ |
| ३ | गंगाखेड | ८४ | २६० | १९२ | ११७ | ७३ | ११ | ०१ | ०१ | ०२ |
| ४ | जिंतुर | १३५ | ५२० | ३१५ | ११६ | ५६ | ४० | ०१ | ०३ | ०४ |
| ५ | पालम | ६७ | २२५ | १५३ | ७० | ५२ | १३ | ०१ | ०३ | ०४ |
| ६ | पुर्णा | ७९ | २८९ | २१५ | ९० | ४५ | ०२ | ०१ | ०३ | ०४ |
| ७ | सेलु | ८२ | २२७ | १५४ | १५१ | ८३ | — | ०१ | — | ०२ |
| ८ | सोनपेठ | ४२ | १३१ | ११२ | ४५ | ३१ | ०१ | ०१ | ०१ | ०३ |
| ९ | मानवत | ४९ | १४६ | १३० | ७७ | २६ | — | ०१ | ०२ | ०४ |
| | एकुण | ७०४ | २३८६ | १६३२ | ९३० | ४६५ | ७६ | ११ | २० | ३७ |

## मानव अधिकार

समाजजीवनात मानवी हक्कांना अनन्यसाधारण महत्व आहे.मानवी हक्क प्रत्येकाचे जन्मसिध्द हक्क असुन ते प्रत्येक मनुष्याच्या अस्तित्वाशी निगडित, अविभाज्य, सार्वत्रिक, समान, पुरोगामी, मुलभुत असे आहेत. मानवी जीवनाचा विकास करण्यासाठी मानवी हक्कांची आवश्यकता असते. मानवी जीवन सुखी, समाधीनी, निर्भय बनविण्यासाठी मानवी हक्क उपयुक्त ठरतात. व्यक्ती—व्यक्ती मिळुन समाज बनतो.म्हणुन समाजातच विकास शक्य होतो. मानवी जीवनात हक्कांना महत्वाचे स्थान आहे. व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी हक्क अत्यावश्यक असतात.या हक्कांशिवाय योग्यरित्या जगताच येणार नाही. माणसांना आपल्या माणुसपणाची व आपल्या निसर्गदत्त हक्कांची ओळख होणे कठीण होते. परंतु काही विचारवंतानी माणसाच्या या नैसर्गिक हक्कांची मांडणी करण्यास प्रारंभ केला. या नवविचारांनी समाज प्रभावित झाला. निसर्गाकडुन माणसांना प्राप्त होणारी संपत्ती ही कोणा एकाची मक्तेदारी नाही तर ती अखिल मानवजातीच्या मालकीची आहे. माणसांना आपल्या स्वच्छेनुसार विकास करण्याचा अधिकार असुन त्यांना मिळणाऱ्या नैसर्गिक अधिकारांचे रक्षण करतात. त्या हक्कांचा संकोच घडु नये असे नविन विचार मांडण्यात येत होते. थॉमस व्हॉब्ज (१५८८—१६७९), जॉन लॉक (१६३२—१७०४), जॉन रूसो (१७१२—१७७८) या फ्रेंच विचारवंतानी सामाजिक कराराचा सिध्दांत मांडुन राजा हा ईश्वराचा अंश आहे. अशा परंपरागत चालत आलेल्या विचारांना छेद दिला. लोकांना निसर्गदत्त अधिकार असतात.हे त्यांनी प्रथमच प्रतिपादन केले. ते हक्क राजान दिलेले नसुन व्यक्तीला जन्मत: प्राप्त होतात व त्यांचे संरक्षण करणे हे राजाचे मुळ कर्तव्य ठरते यासारखे प्रागतिक विचार मांडले. या शिवाय इंग्लंडमध्ये राजाकडुन लोकांनी एक हक्क सनद मंजुर करून घेतली, त्याला ‘‘मॅग्नाकार्टा’’ असे म्हणतात. या सनदेच्या ३९० या कलमानुसार कोणताही गुन्हा सिध्द झाल्याशिवाय तुरूंगात टाकता येणार नाही व हद्दपार करता येणार नाही. किंवा त्याची मालमत्ता जप्त करता येणार नाही असे मंजुर करण्यात आले.

संयुक्त राष्ट्रसंघाने १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्कांचा जाहीरनामा मंजुर केला. हा जाहीरनामा जगाती प्रत्येक व्यक्तीला मग त्याचा वंश, जात, रंग, लिंग किंवा राष्ट्रीयत्व कोणतेही असो, माणसाने माणुस म्हणुन जगण्यासाठी ज्या किमान

हक्कांची जरूरी आहे असे प्राथमिक मानवी हक्क प्रदान करीत आहे व त्याचे संरक्षण करीत आहे. जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांनी मानवी हक्कांचा या जाहीरनाम्याचा स्वीकार केलेला आहे. भारतीय राज्यघटनेने नागरिकांना मानवी हक्क दिलेले आहेत. मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आणि अंमलबजावणीसाठी भातरतात १९९३ साली मानवी हक्क—कायदा अमलात आणला गेला.मानवी हक्क सुरक्षितता कायदा १९९४ नुसार भारतात राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आणि अमंलबजावणीसाठी अन्य घटनात्मक तरतुदी व कायदे करण्यात आलेले आहेत.

**भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिकाः—**

भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेत सार्वभौमत्व, लोकशाही, गणराज्य, धर्मनिरपेक्षता व समाजवाद ही तत्वे स्वीकृत केली आहेत. याशिवाय भारतीय नागरिकांना आर्थिक, राजकीय, सामाजिक न्याय, दर्जा व संधी याबाबत समता व श्रध्दा, विचार, उच्चार व लेखन स्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. सर्व नागरिकांमध्ये बंधुभाव निर्माण करण्याचे अभिवचन देण्यात आलेले आहे.

## भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्क/अधिकार

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | समतेचा अधिकार | कलम १४ ते १८ | Right of Equality |
| ०२ | स्वातंत्र्याचा अधिकार | कलम १९ ते २२ | Right to Freedom |
| ०३ | शोषणाविरूध्दचा अधिकार | कलम २३ ते २४ | Right Against Exploitation |
| ०४ | धर्म स्वातंत्र्याचा अधिकार | कलम २५ ते २८ | Right to Religion |
| ०५ | सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार | कलम २९ ते ३० | Right to Culture & Education |
| ०६ | संपत्तीचा अधिकार | कलम ३१ | Right to Property |
| ०७ | घटनात्मक उपायांचा अधिकार | कलम ३२ | Right to Constitutional Remedies |

भारतीय घटनेच्या कलम १२ ते ३५ मध्ये मुलभुत हक्कांबाबत उल्लेख केलेला आहे.

१) **समतेचा अधिकार (कलम १४ते १८)**

अ. **(कलम १५):** कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान आहेत. भारतीय प्रदेशात कायद्याचे समान संरक्षण मिळेल.

ब. **भेदभाव नसावा (कलम १५)** :धर्म,वंश,जात,भाषा,लिंग व जन्मस्थान या

अधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही. सर्व नागरिकांना सार्वजनिक हॉटेल,विहीर,तलाव,स्नानगृहे,रस्ते व चित्रपटगृहे या ठिकाणी समान तत्वावर प्रवेश असेल.

क. **समान संधी (कलम १६):** सर्व भारतीयांना शासनाच्या सेवेत समान संधी असेल संसद कायदा करून अधिकार देउ शकते. दलित व मागासवर्गीय जमातींना नोकरीत जागाा देउ शकेल.

ड. **अस्पृश्यतेची समाप्ती (कलम १७):** भारतात अस्पृश्यतेची समाप्ती करण्यात आलेली आहे. अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा मानण्यात आला.

इ. **पदव्यांची समाप्ती (कलम १८):** बिटिश काळात भारतातील काही व्यक्तींना सामाजिक व राजकीय कार्याबाबात विशेष पदव्या देत असत. उदा. रावसाहेब,रावबहादुर,जहागीरदार या पदव्यासोबत विशेष अधिकार मिळत होते. घटनेच्या या कलमान्वये या पदव्या नष्ट करणत आल्या.

२. **स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९):** भारतीय नागरिकांना सात प्रकारचे स्वातंत्र्य देण्चयात आलेले आहेत.

अ. भाषण करणे व विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य.

ब. शांततापुर्वक व शस्त्र न बाळगता एकत्र येण्यााचे स्वातंत्र्य.

क. संस्था व संघ स्थापन करण्याचे स्वातंत्र्य.

ड. भारतीय प्रदेशात कोठेही संचार करणचे स्वातंत्र्य.

इ. भारतातील प्रदेशात कोठेही संचार करणचे स्वातंत्र्य.

उ. धंदा,व्यवसाय व व्यापार करण्याचे स्वातंत्र्य

अर्थात या सर्व सवातंत्र्यावर मर्यादा टाकण्यात आलेल्या आहेत.

३. **शोषणाविरूध्दचा अधिकार/हक्क (कलम २३ ते २४) :**

घटनेच्या कलम २३ नुसार वेठबिगार सक्तीचे काम करून घेणे किंवा सक्तीची मजुरी कायद्याने बंद केली आहे. कलम २४ नुसार १४ वर्षाखालील मुलांना खाणी, रेल्वे, कारखाने, अवजड यंत्र इ. कामांना लावता येणार नाही.

४. **धर्मस्वातंत्र्याचा अधिकार (कलम २५ ते २८) :**

अ. कलम २५: प्रत्येक नागरिकाला कोणत्याही धर्माचा स्वीकार किंवा प्रचार करण्याचा अधिकार असेल.

ब. कलम २६: प्रत्यक धार्मिक संस्थेला अंतर्गत कारभार पाहण्याचे स्वातंत्र्य असेल,संपतीची विल्हेवाट लावण्याचे स्वातंत्र्य.

क. कलम २७: ज्या करांच उत्पन्न एखाद्या विशिष्ट धर्माच्या प्रचारसाठी व रक्षणासाठी खर्च घेणार असेल असे कर सक्तीने वसुल केले जाउ शकत नाहीत.

इ. कलम २८: धार्मिक शिक्षण देण्याच्या हेतुने दिलेल्या देणगीतुन वा विश्वस्त निधीतुन चालणाऱ्या संस्था असल्यास गोष्ट निराळी त्याठीकाणी प्रार्थना, पुजा, विशीष्ट धर्माचे विधी सर्वासाठी सक्तीचे केले जाणार नाहीत.

**५. सांस्कृतिक अधिकार (कलम २९ ते ३०) :**

घटनेच्या २९ व्या कलमानंसार आपली भाषा,लिपी,संस्कृतीची जापसना करण्याचे स्वातंत्र्य आहे. राज्याने अनुदान दिलेल्या शिक्षण संस्थामध्ये प्रवेश देताना भेदभाव केला जाणार नाही.

**६. संपत्तीचा अधिकार (कलम ३१) :**

कोणत्याही नागरिकाला त्याच्या खाजगी मालमत्तेपासुन वैद्य मार्गाशिवाय वंचित केले जाणार नाही. प्रत्येक नागरिकाला खासगी मालमत्ता बाळगण्याचा व खर्च करण्याचा अधिकार आहे.

**७. घटनात्मक उपायांचा अधिकार (कलम ३२) :**

घटनेच्या ३२ व्या कलमानुसार मुलभुत अधिकारांच्या भंगाबाबत सर्वोच्च न्यायालयाकडे विनंती अर्ज करता येतो न्यायालय पाच प्रकारचे आदेश देते.

## समारोप :

भारतात मानवी हक्कांबद्दल जागृती नसल्याची जी कारणे आहेत त्यामध्ये नागरिकांच अज्ञान, लोकसंख्यावाढ आणि साधणांची कमतरता ही कारणे अधिक महत्वाची मानावी लागतील. मानवी हक्कांच्या संरक्षण व अंमलबजावणीसाठी सध्या असलेली यंत्रणा अत्यंत तुटपुंज्या साधनांनिशी कार्यरत आहे. राष्ट्रीय पातळीवरील आयोगाकडे मंत्रालयासदृश मनुष्यबळ, अधिकार बळ वाढविणे आवश्यक आहे. देशातील सर्व राज्यात 'राज्यस्तरीय मानवी हक्क आयोग' स्थापन केले पाहिजेत.

मनवी प्रतिष्ठा, राजगाार र्प्यावरण व शिक्षण यांचे ज्या प्रकरणात उल्लघंन होते, त्यांचा मानवी हक्क आयोगाने अभ्यास करून न्यायालयात अशा व्यक्तींचे प्रतिनिधित्व करावे जेणे करून दुर्बल घटकांच्या मानवी हक्कांचे संरक्षण मानवी हक्क आयोग

अधिक समर्थपणे करू शकेल.

- फ्रेंच राज्यक्रांती व मानवी हक्क
- संयुक्त राष्ट्रसंघाकडुन पुरस्कार
- हक्कांची आवश्यकता
- मानवी हक्क आणि संयुक्त राष्ट्रसंघ
- संयुक्त राष्ट्रसंधाची सनद
- मानवी हक्क अयोग
- अल्पसंख्याकांसंबंधीचा उपआयोग
- महिला अयोग
- निर्वासितांकरिताचे उच्यायुक्तांच कार्यालय

## मानवी हक्कांचा जाहीरनामा

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ रोजी 'मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा' संमत व स्वीकृत केला. या जाहीरनाम्याच्या प्रस्तावनंत असे म्हटले आहे की, सर्व मानवांना समान हक्क मिळणे आणि त्यांच्या प्रतिष्ठेचे रक्षण होणे हा जगाातील स्वातंत्र्य,न्याय वशांतता यांचा पाया होय. तसेच मानवी हक्कांचे उल्लंघन व त्यांचा अनादर यांतुन निर्माण होणारी रानटी कृत्ये हा मानव जातीच्या सदसदविवेकबुध्दीवर झालेला आघात होय म्हणुन मानवी हक्कांचे रक्षण होण्यासाठी त्यांच स्वरूप समाजावुन घेणे अत्यंत महत्वाचे ठरते.

## जाहीरनाम्यातील तत्वे:

मानवी हक्कांच्या जाहीरनाम्याती महत्वाची तत्वे किंवा मानवी हक्ककांचे मापदंड आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील:—

१) सर्व मानव प्रतिष्ठा व हक्क यांबाबतीत जन्मत: स्वतंत्र व समान आहेत.

२) वंश, वर्ण, लींग भाषा, धर्म, राजकीय किंवा अन्य मत, राष्ट्रीय किंवा सामाजिक मुल, संपत्ती, जन्म अथवा अन्य दर्जा यांपैकी कोणत्याही आधारावर भेदभाव न करता प्रत्येक व्यक्ती या जाहीरनाम्यातील सर्व हक्क व स्वातंत्र्य यांचा लाभ घेण्यास पात्र आहे.

३) प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचा, स्वातंत्र्याचा आणि व्यक्तीगत सुरक्षीततेचा हक्क आहे.

४) कोणतीही व्यक्ती गुलामगिरीत किंवा वेठबिगारीत ठेवली जाणार नाही.

५) कोणत्याही व्यक्तीचा छळ किंवा शारीरीक हाल केले जाणार नाहीत

६) कायद्यापुढे प्रत्येकाला एक व्यक्ती किंवा मनुष्य म्हणुन ओळखले जाण्याचा हक्क असेल.

७) प्रत्येक व्यक्ती कायद्यापुढे समान आहे.

८) राज्यघटनेने किंवा कायद्याने व्यक्तीला दिलेल्या मुलभुत हक्कांचे उल्लंघनविरूध्द संरक्षण

९) कोणत्याही व्यक्तीला अकारण कैदेत किंवा तूरूंगात ठेवले जाणार नाही.

१०) प्रत्येक व्यक्तीला तिच्याविरूध्द गुन्हेगारी स्वरूपाचे आरोप ठेवले गेले असतील किंवा तिचे हक्क व बंधने निश्चित करावयाची असतील तर, स्वतंत्र व नि:पक्ष न्यायपीठासमोर तिची सुनावनी केली जाण्याचा हक्क आहे.

११) गंभीर गुन्ह्याचा आरोप असलेल्या प्रत्येकाला, जापर्यंत त्यस कायद्यानुसार दोषी ठरविले जात नाही तोपर्यंत,निर्दोषत्वाचा दावा करण्याचा हक्क आहे.

१२) कोणत्याही व्यक्तीच्या खाजगी जीवनात,कौटंबिक जीवनात,घरगुती बाबतीत किंवा पत्रव्यवहारात एकतर्फी हस्तक्षेप केला जाणार नाही अथवा त्याच्या सन्मान व लौकिक यांना धक्का पोहोचविला जाणार नाही. अशा प्रकारच्या व्यक्तिगत हल्यापासुन किंवा हस्तक्षेपापासुन स्वत:चे संरक्षण करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे.

१३) प्रत्येकाला त्याच्या राज्याच्या सरहद्दीमध्ये आत कोठेही मुक्त संचार करण्याचा आणि वास्तव्य करण्याचा अधिकार आहे.

१४) प्रत्येक व्यक्तीस त्याचा मातृदेश अथवा अन्य देश सोडण्याचा हक्क आहे.

१५) प्रत्येकास दुसऱ्या देशाकडे आश्रय मागण्याचा हक्क आहे.

१६) प्रत्येकाला राष्ट्रीय हक्क आहे.कोणत्याही व्यक्तीचे राष्ट्रीयत्व एकतर्फी हिरावुन घेतले जाणार नाही किंवा राष्ट्रीयत्व बदलण्याचा त्याचा हक्क नाकारला जाणार नाही.

१७) प्रौढ स्त्री—पुरूषांना वंश,राष्ट्रीयत्व किंवा धर्म यांच्या बंधनाखेरीज विवाहाचा हक्क

आहे.

१८) कुटुंब हा समाजाचा एक नैसर्गिक आणि मुलभुत समुह घटक आहे म्हणुन त्यास समाज व राज्य यांचे संरक्षण प्राप्त करण्याचा हक्क आहे.

१९) प्रेत्येकाला स्वत: तसेच इतरांसमवेत संपत्ती धारण करण्याचा अधिकार आहे.

२०) प्रत्येकाला विचार करण्याचा सदसद्‌विवेकबुध्दी बाळगण्याचा व धर्माचे पालन करण्यचा हक्क आहे.

२१) प्रत्येकाला मत व अभिव्क्ती स्वातंत्र्याचा हक्क आहे.

२२) प्रत्येकाला शांततामय मार्गाने एकत्र येण्याचा आणि संघटना स्थापन करण्याचा हक्क आहे.

२३) प्रत्येक व्यक्तीस त्याच्या देशाच्या राज्यकारभारात प्रत्यक्षरीत्या अथवा निवडुन दिलेल्या प्रतिनिधीमार्फत भाग घेण्याचा हक्क आहे.

२४) प्रत्येकास समाजाचा सदस्य या नात्याने सामाजिक सुरक्षिततेचा हक्क आहे.

२५) प्रत्येकाला काम करण्याचा,स्वत:च्या इच्छेनुसार रोजगााराची निवड करण्याचा हक्क आहे.

२६) कोणत्याही भेदभावाशिवाय समान कामासाठी समान वेतन मिळविण्याचा हक्क प्रत्येक व्यक्तीस आहे.

२७) हितसंबंधांच्या रक्षणासाठी कामगार संघटना स्थापन करण्याचा आणि संघटनेत सामील होण्याचा हक्क प्रत्येकास आहे.

२८) प्रत्योकला विश्रांतीचा,कामाच्या तासांवर वाजवी मर्यादा घलण्यासंबंधीचा आणि पगारी सुट्या मिळविण्याचा हक्क आहे.

२९) प्रत्येकाला म्याचे स्वत:चे आणि त्याच्या कुटुंबीयाचे आरोग्य व स्वास्थ्य चांगले राहील अशा प्रकारे जीवनमानाचा दर्जा प्राप्त करण्याचा हक्क आहे.

३०) मार्तत्व आणि बालपण हे विशेष काळजी आणि साहाय्य यास पात्र आहेत.

**<u>दोन आंतरराष्ट्रीय करारनामे:</u>**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेच्या सुचनुनुसार मानवी हक्क आयोगाने मानवी हक्कांची परिणामकारक अंमलबजावणी करता योवी यासाठी दोन महत्वपुर्ण करारनाम्यांचे आराखडे तयार केले आहेत.

१) आर्थिक,सामाजिक व सांस्कृतिक हक्कांसंबंधीचा आंतरराष्ट्रीय करारनामा.

२) नागरी व राजकीलय हक्कांसंबंधीच्या आंतरराष्ट्रीय करारनामा.

**भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क:**

संयुक्त राष्ट्रसंघाने स्वीकरलेल्या मानवी हक्कविषयक सार्वत्रिक जाहीरनाम्याचे प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेतही पडले असल्याचे आपणास स्पष्टपणे दिसुन येते. आपल्या घटनाकारांनी मानवी हक्कांचा पुरस्कार करण्याचे आणि त्या हक्कांना इतके महत्व देण्याचे कारण असे की, त्यांचा लोकशाही मुल्यांवर पुर्ण विश्वास होता. नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य हे लोकशाही व्यवस्थेचे मुख्य आधार होत हेदेखील ते आहेळखुन होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले होते की,नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य हे लोकशाही व्यवस्थेचे मुख्य आधार होत हेदेखील ते ओळखुन होते.

**राज्यघटनेतील मुलभुत हक्क:**

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते३५ पर्यंत मुलभुत हक्कांची चर्चा करण्यात आली आहे. राज्यघटनेतील मुलभुत हक्कांपैकी काही हक्क भारतीय नागरिकांसाठी आहेत तर काही हक्क सर्वांसाठी आहेत.सर्वासाठी असलेल्या हक्कांचा लाभ भारतीय नागरिकांप्रमाणे परकीय व्यक्तींनाही घेता येतो.

**भारतीय राज्यघटनेतील सहा मुलभुत हक्क पुढीलप्रमाणे आहेत—**

**समतेचा हक्क:**

१) **कायद्यापुढे समानता आणि कायद्याचे समान संरक्षण:**

सर्व व्यक्ती कायद्यापुढे समान असतील आणि प्रत्येकाला कायद्याचे समान संरक्षण प्राप्त होईल अशी हमी राज्यघटनेने दिली आहे.

२) **भेदभावाचा अभाव:**

आपल्या राज्यघटनेने असे स्पष्ट केले आहे की, धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यांपैकी कोणत्याही आधारे राज्य नागरिकांमध्ये भेदभाव करणार नाही.

३) **संधीची समानता:**

राज्यघटनेने हेदेखील स्पष्ट केले आहे की, कोणत्याही नागरिकाला धर्म, वंश, जात, लिंग, कुळ, जन्मस्थान, वास्तव्याचे ठिकाण या किंवा यापैकी कोणत्याही एका कारणावरून राज्याच्या नियंत्रणाखालील पद मिळविण्यास अपात्र ठरविले जाणार नाही.

४) **अस्पृश्यता पाळण्यास बंदी:** राज्यघटनेने अस्पृश्यता पाण्यास बंदी घातली आहे.

५) **पदव्या देण्यास बंदी :** राज्याकडुन नागरिकांना सन्मानदर्शक पदव्या दिल्या जाण्याच्या प्रथेला राजयघटनेने बंदी घातली आहे.

**स्वातंत्र्याचा हक्क:**

१) भाषण व मतप्रदर्शन स्वातंत्र्य

२) शांततापुर्वक व शस्त्र न बाळगता एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य.

३) संस्था किंवा संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य.

४) भारतीय प्रदेशात सर्वत्र मोकळेपणाने संचार करण्याचे स्वातंत्र्य.

५) भारतीय प्रदेशात कोठेही राहण्याचे किंवा कायम वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य.

६) कोणताही व्यवसाय, रोजगाार आणि व्यापार वा उद्योग करण्याचे स्वातंत्र्य.

**शोषणाविरूध्दचा हक्क:**

राज्यघटनेने माणसांचा कयविकय करणे किंवा एखाद्याकडुन वेठबिगाराप्रमाणे सक्तीने काम करवुन घेणे अशा प्रकारांवर बंदी घातली आहे.तसेच चौदा वर्षाखालील मुलांना कारखाने, खाणी, किंवा अन्य जोखमीच्या ठिकाणी कामावर इेवण्यास मनाई केली आहे.

**धार्मिक स्वातंत्र्यांचा हक्क:**

राज्यघटनेने सर्व व्यक्तींना आपल्या सदसद्‌विवेकबुध्दीनुसार वागण्याचे आणि आपल्या धर्माचे पालन व प्रचार करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे.

**सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क:**

भारतीय प्रदेशात किंवा त्याच्या काणत्याही भागात वास्तव्य करणाऱ्या नागरिकांच्या कोणत्याही विभागाला स्वत:ची स्वतंत्र भाषा,लिपी,किंवा संस्कृती अबााधित राखण्याचा हक्क आहे.

**घटनात्मक उपाययोजनेचा हक्क:**

१) बंदी प्रत्यक्षीकरण २) परमादेश ३) प्रतिषेध

४) अधिकारपृच्छा ५) उत्प्रेक्षण

**राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे:**

१) लोकांच्या कल्याणासाठी ज्या सामाजिक व्यवस्थेत सामाजिक,आर्थिक व राजकीय न्याय असेल अशी सामाजिक व्यवस्था निर्माण करून ती टिकविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

२) जनतेमधील दर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धनाची राज्य विशेष काळजी घेईल.

३) राज्य आपल्या जनतेच्या आहाराच्या पौष्टीकतेचे मान वाढविण्याकडे आणि तिच्या राहमानाचा दर्जा उंचाविण्याकडे लक्ष देईल.

४) स्त्री—पुरूष सर्व नागरिकांना उपजीविकिची परेशी साधने उपलब्ध होण्याचा हक्क मिळवुन देण्यासाठी राज्याकडुन प्रयत्न केला जाईल.

५) ज्यामुळे सर्वांचे कल्याण साध्य होईल अशा पध्दतीने समाजाच्या भौतिक साधनांची मालकी आणि नियंत्रणे यांचे वाटप करण्यात येईल.

६) राज्य आपली आर्थिक क्षमता आणि विकास यांच्या मर्यादेत काम मिळयाचा हक्क, शिाक्षणाचा हक्क आणि बेकारी,व ृध्दत्व आजारपण, अपंगत्व अशा अवस्थेतील लोकांसाठी सार्वजनिक मदत, हे हक्क नागरिकांना मिळवून देण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करील.

७) शेती, उद्योगधंदे व इतर सार्वजनिक क्षेत्रांतील कामगारांना पुरेसे काम, वेतन, राहणीमानचा योग्य दर्जा आणि विश्रांती तसेच सामाजिक व सांस्कृतिक संधी यांची हमी देणारी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देण्याची दक्षता राज्य घेईल.

८) स्त्री व पुरूष यांना समान कामासाठी समान वेतन मिळवुन देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

९) राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासुन दहा वर्षाच्या आत चौदा वर्षाखालील सर्व मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची व्यवस्था राजय करील.

१०) स्त्री—पुरूष कामगारांचे आरोग्य आणि शक्ती तसेच मुलांचे कोवळे वय यांचा दुरूप्योग केला जाणार नाही याची काळजी घेतली जाईल.

११) कामाच्या ठिकाणी न्याय्य व माणुसकीची परिस्थिती निर्माण करण्याची आणि

प्रसुतिसाहाय्य मिळवुन देण्याची व्यवस्था राज्य करील.

१२) वय व शक्ती यानुसार व्यवसायांचे वाटप

**मानवी हक्क संरक्षण कायदा: १९९३**

भारतीय संसदेने मानवी हक्क संरक्षण कायदा संमत करण्यास आंतरराष्ट्रीय संघटनेची त्यासंबंधीची भुमिकाही कारणीभुत झाली आहे. मानवी हक्क संरक्षण कायद्यात राष्ट्रीय मानवी हक्क आयोग,राज्य मानवी हक्क आयोग आणि मानवी हक्क न्यायालये यांच्या स्थापनेची तरतुद आहे.

## राष्ट्रीय मानवी हक्क आयोग :—

**रचना:**

१) **अध्यक्ष:** सर्वोच्च न्यायालयाची मुख्य न्यायाधीश पद भुषविलेले व्यक्ती

२) **एक सदस्य:** सर्वाच्च न्यायालयाच्या न्यायाधीश पदावर राहिलेली व्यक्ती

३) **एक सदस्य:** उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश या नात्याने भुषविलेली अथवा ते पद भुषवित असलेली व्यक्ती.

४) **दोन सदस्य:** मानवी हक्कांशी संबंधित ज्ञान किंवा व्यावहारिक अनुभव असलेल्या व्यक्ती.

५) राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष,अनुसुचित जाती व अनुसुचित जमातींच्या राष्ट्रीय आयोगांचे अध्यक्ष आणि राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा या आयोगाचे सदस्य या नात्याने कार्य करतील.

६) **सरचिटणीस:** आयोगाचा एक सरचिटणीस असेल आणि तो आयोगाचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणुन कार्य करील.

**राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे अधिकार व कार्ये :—**

१) मानवी हक्क उल्लंघन करण्यात आलेल्या तक्रारींची चौकशी करणे.

२) न्यायालयात मानवी हक्काच्या उल्लंघनाविषयी एखादे प्रकरण पडुन असेल तर न्यायालयाच्या संमतीने त्यात हस्तक्षेप करणे.

३) राज्य सरकारला पुर्वसुचना देउन त्या राज्यातील कोणतयाही तुरूंगास किंवा इतर संस्थांना भेटी देणे.

४) मानवी हक्कांच्या रक्षणासाठी राजयघटनेत अथवा अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्यात केलेल्या तरतुदींचे समीक्षण करणे आणि त्या अधिक परिणामकारक ठराव्यात यासाठी सुचना करणे.

५) मानवी हक्कांना बाधक ठरणाऱ्या दहशतवादासारख्या घटकांचे समीक्षण करणे आणि त्यासंबंधी योग्य त्या उपाययोजना सुचविणे.

६) मानवी हक्कविषयक आंतरराष्ट्रीय तह व करार यांचे अध्ययन करणे आणि त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी उपाययोजना सुचविणे.

७) मानवी हक्कांच्या क्षेत्रात संशोधन हाती घेउन त्यास चालना देणे.

८) समाजाच्या विविध विभागांत मानवी हक्क साक्षरतेचा प्रसार करणे.

९) मानवी हक्कांच्या क्षेत्रात कार्य करीत असलेल्या अशासकीय संघटना व संस्था यांच्या कार्याला प्रोत्साहन देणे.

१०) मानवी हक्कांना चालना देण्यासाठी आवश्यक वाटणारी अन्यकार्ये हाती घेणे.

**<u>राज्य मानवी हक्क आयोग:—</u>**

**<u>रचना:</u>**

१) **अध्यक्ष:** उच्च न्यायालयाची मुख्य न्यायाधीश पद भुषविलेले व्यक्ती

२) **एक सदस्य:** उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश पदावर राहिलेली व्यक्ती

३) **एक सदस्य:** जिल्हा न्यायालयातील मुख्य न्यायाधीश या नात्याने भुषविलेली अथवा ते पद भुषवित असलेली व्यक्ती.

४) **दोन सदस्य:** मानवी हक्कांशी संबंधित ज्ञान किंवा व्यावहारिक अनुभव असलेल्या व्यक्ती.

**<u>राज्य मानवी हक्क आयोगाचे अधिकार व कार्ये :—</u>**

१) मानवी हक्क उल्लंघन करण्यात आलेल्या तक्रारींची चौकशी करणे.

२) न्यायालयात मानवी हक्काच्या उल्लंघनाविषयी एखादे प्रकरण पडुन असेल तर न्यायालयाच्या संमतीने त्यात हस्तक्षेप करणे.

३) राज्य सरकारला पुर्वसुचना देउन त्या राज्यातील कोणतयाही तुरूंगास किंवा इतर संस्थांना भेटी देणे.

४) मानवी हक्कांच्या रक्षणासाठी राजयघटनेत अथवा अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्यात केलेल्या तरतुदींचे समीक्षण करणे आणि त्या अधिक परिणामकारक ठराव्यात यासाठी सुचना करणे.

५) मानवी हक्कांना बाधक ठरणाऱ्या दहशतवादासारख्या घटकांचे समीक्षण करणे आणि त्यासंबंधी योग्य त्या उपाययोजना सुचविणे.

६) मानवी हक्कविषयक आंतरराष्ट्रीय तह व करार यांचे अध्ययन करणे आणि त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी उपाययोजना सुचविणे.

७) मानवी हक्कांच्या क्षेत्रात संशोधन हाती घेउन त्यास चालना देणे.

८) समाजाच्या विविध विभागांत मानवी हक्क साक्षरतेचा प्रसार करणे.

९) मानवी हक्कांच्या क्षेत्रात कार्य करीत असलेल्या अशासकीय संघटना व संस्था यांच्या कार्याला प्रोत्साहन देणे.

१०) मानवी हक्कांना चालना देण्यासाठी आवश्यक वाटणारी अन्यकार्ये हाती घेणे.

**<u>मानवी हक्क न्यायालये :—</u>**

सन १९९३ च्या मानवी हक्क संरक्षण कायद्यात मानवी हक्क न्यायालयांची स्थापना करण्यासंबंधीही तरतुद आहे. मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्याच्या घटनेतुन उद्‌भवणाऱ्या गुन्ह्यांची जलदगतीने सुनावणी करण्यासाठी राज्य सरकार उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाच्या संमतीने मानवी हक्क न्यायालयांची स्थापना करू शकते. तथापि,अशा खास न्यायालयाची जिल्ह्यात अगोदरच स्थापना करण्यात आली असेल तर मानवी हक्क न्यायालय स्थापन केले जाउ शकत नाही.

**<u>गरिबी :—</u>**

गरिबीचा अर्थ स्पष्ट करणे किंवा गरिबीचे निकष ठरविणे फारसे कठीण नाही. मानवाच्या काही आवश्यक किंवा प्राथमिक गरजा असतात. ज्या परिस्थितीत मानवाला आपल्या या आवश्यक किंवा प्राथमिक गरजा भागविणे शक्य होत नाही, त्या परिस्थितीला 'गरिबी' असे म्हटले जाते.

**<u>निरक्षरता :—</u>**

निरक्षरता माणसाला मानवी हक्कांपासुन वंचित ठेवण्यास कशी कारणीभुत होते हे सहज समजण्यासारखी आहे.

**बेकारी :—**

बेकारीचे जीवन वाट्याला आलेल्या व्यक्तीला समाजात सन्मानाने जगता येत नाही.

**हिंसाचार :—**

सामाजिक जीनातील हिंसाचाराची वाढती प्रतृत्ती हादेखील मानवी हक्कांच्या मार्गातील आणखी एक महत्वाचा अडसर बनु लागला आहे. हिंसाचारामुळे जीविताची व वित्ताची मोठ्या प्रमाणावर हानी होते.

**भ्रष्टाचार :—**

सनदी सेवेतील अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्याने आपल्या सार्वजनिक पदाचा व्यक्तिगत लाभासाठी वापर करणे म्हणजे भ्रष्टाचार.

**दहशतवाद :—**

दहशतवाद या संकल्पनेत 'दहशत' हा शब्द महत्वाचा आहे. सामान्य लोकांच्या मनात दहशत किंवा भीती निर्माण करून आणि त्यांना वेंठीस धरून त्या जारावर आपली उदिष्टे साध्य करण्याचा काही गटांनी चालविलेला पर्यत्न म्हणजे दहशतवाद होय.

**पोलीस कोठडीतील गुन्हे :—**

मानवी हक्कांच्या संदर्भात पोलीस कोठडीतील गुन्ह्यांचीही गांभीर्याने दखल घेण्याची वेळ आता आलेली आहे. वास्तविक पाहता पोलिसांची भुमिका कायदा व सुव्यवस्था रक्षकांची असते.

**पोलीस चौकीतील गुन्ह्यांची कारणे :—**

१) अधिकारशाही प्रवृत्ती

२) वासाहतिक शासनाचा वारसा

३) पोलीस व गुन्हेगाार यांचे लागेबांधे

४) राजकीय हस्तक्षेप

५) आर्थिक लाभाची अपेक्षा

६) व्यक्तीगत हिशेब चुकता करण्याचा डाव

## अजाजअप्रका व नाहसका खालील दाखल झालेल्या गुन्ह्या बाबत

| अ. क्र. | गुन्ह्याचा प्रकार | दि.१.४.९५ ते३०.११.०९ पावेतो दाखल गुन्हे | पोलीस तपासा—व रिल गुन्हे | न्यालयात दाखल गुन्ह्यांची संख्या | न्यायालयाचा निकाल | | | न्यायाल यात प्रलंबित | इतर पोलीस निकाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | शिक्षा | सुटली | इतर निकाल | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | खुन | १३ | — | १० | २ | ३ | — | ५ | १ अ.फा<br>१ ब.फा<br>१ अ.ॲबिटेड |
| २ | गंभीर दुखापत | २९ | — | २७ | १ | ७ | १ | १८ | १ ब.फा<br>१ना.का.फा. |
| ३ | बलात्कार | २४ | ४ | १८ | ३ | १० | — | ५ | १ ब.फा<br>१ अ.अ. |
| ४ | जाळपोळ | २१ | ०१ | १४ | — | ९ | — | ५ | २ अ.फा.<br>४ क.फा. |
| ५ | ईतर | ६५९ | १५ | ५९२ | १५ | ३८७ | २७ | १६३ | ७ अ.फा<br>२७ ब.फा<br>६ क.फा.<br>१२ना.का.फा. |
| | एकुण | ७४६ | २० | ६६१ | २१ | ४१६ | २८ | १९६ | १० अ.फा<br>३० ब.फा<br>१० क.फा.<br>१३ना.का.फा.<br>२ अॲबिटेड |

**Review of Litrature :**

मागील दोन दशकात स्थानिक स्वराजय संस्थेचे कार्य आणि प्रशासन यावर अनेक संशोधक व संशाधक विदयार्थ्यानी अभ्यास केलेले आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या प्रक्रीयेतुनच स्थानिक स्वराज्य संस्थेची निर्मिती झालेली आहे. दलीत व समाजातील वंचीत घटकांकडुन यात वाव मिळाला आहे. (हरीश—२००१, कुक आणि मॅनोर—१९९८ घाटक—२००२) आणखी काही अध्ययनात आढळुन आले आहे की ग्रामीण समाजाच्या संरचनेत बदल झालेला आहे.याचे कारण म्हणजे भौगोलीक स्थान,मर्यादीत आर्थीक स्त्रोत,दारिद्रयखाली राहणारे लोक, गरीबलोक, दबावाखाली जीवण जगणारे लोक मतदान वेळेवर न होणे दृसीानिक स्वराज्य संस्थेची निर्मिती संविधानाच्या ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार करण्यात आलेली आहे. मानवअधिकाराचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन होत होते ते थांबवण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेची मदत होते.

**अध्ययनाचे उद्देश :—**

१) पंचायतराज व्यवस्थेबदल जाणून घेणे आणी जनसहभागाच्या दृष्टीकोणाचा विकास करणे यामुळे सामाजिक न्यायाची प्रस्थापना होइल.

२) स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सक्रीयेतेची माहीती घेणे,जबाबादारी ग्रामसभेत दलीताचा सहभाग.

३) लोकप्रतिनिधीच्या सभा व त्याचा सहभाग याचे अध्ययन.

४) स्थानिक स्वराज्य संस्थेची शक्ती, त्यांचे दोष जाणुन घेणे.

५) दलितांच्या मानवअधिकार उल्लंघनाचे अध्ययन करणे.

**गृहितके :—**

१) स्थानिक स्वराज्य संस्था आपली स्वायत्तेचा आनंद घेत आहे का, कारण ही व्यवस्था लोककेंद्रीत आहे. त्यामुळे जबाबदारी व मानव अधिकारांची हामी मिळते का.

२) स्थानिक स्वराज्य संस्थेस राज्य आणि इतर विभाग मानव अधिकाराच्या प्रस्तापणसाठी सार्वभौमता, एकता, स्वातंत्र्य हे टिकवतात का.

३) स्थानिक स्वराज्य संस्थेत दलीतांचा सहभाग कितपत आहे आणि ते आपल्या मानव अधिकाराचा कीतपत उपयोग घेतात.

**Singnificance of Study :**

प्रस्तुत अध्यय खालील कारणांशी संबंधीत आहे.

१) स्थानिक स्वराज्य संस्था, शक्तीच्या विकेंद्रीकरणाचा सर्वात महत्वाचा घटक आहे आणि विकासाच्या अधिकाराबाबत त्यांची भूमिका.

२) ७३ व्या घटनादुरूस्ती नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेची भुमिका

३) या अध्ययनात कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, नागरी संघटना,यांचे संबंध आणि मानव अधिकार विकासातील भुमिका.

**Universe of the Study :**

या अध्ययणात परभणीतील एक तालुका घेतला आहे. ऐतीहासिक पार्श्वभूमी मागाासवर्गीय जिल्हा आहे. निझामाच्या जोखडामध्ये अनेक वर्ष हा जिल्हा होता स्वातंत्र्यापासुन अनेक विकास योजनाची अंमलबजावणी जल स्वराज्य, राष्ट्रीय ग्रामिण

आरोग्य योजना, राष्ट्रीय ग्रामिण राजगाार गारंटी कारदा,बालविकास योजना,इंदिरा आवास योजना इ. पंचायतीराज संस्थेद्वारे राबवण्यात येतात.यामुळे वंचीत व दलीत याच्यात थोड्या प्रमाणात विकास झालेला आहे. ह्या जिल्ह्यात गरिबी, निरक्षरता (४५टक्के), मुलींच्या संख्येत घट, शेतीतील उत्पादनात घट,लींग भेदभाव, भुमीहीनता, शेतकऱ्यांच्या आत्महत्या गेल्या काही वर्षात दलीताच्या आत्याचारत वाढझालेली आहे. बलात्कार, खुन, जाळपोळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या वेळेसचे प्रकार, मंदीर प्रवेश, पंचायतमध्ये सदस्य, निवडणुकीतील, हींसा, अन्याय इ. सध्या १९ विकास विषयक योजना राबवल्या जात आहेत. शिक्षण, शेती, आरोग्य केंद्रे, इ. हे सर्व पंचायत राज संस्थेद्वारे व त्याच्या प्रशासनाद्वारे राबवले जाते. मागसपणा,ग्रामीण गरिबी, दलीतांच्या अध्किाराच्या संरक्षणासाठी पंचायतराज संस्था चांगल भूमिका बजावत आहे.

## **Methodology :**

या अध्ययनात तात्वीक संशोधन पध्दतीचा वापर केलेला आहे. यात खालील इतिहासिक, राजकीय, आर्थिक, सरकारी प्रक्रीयेशी संबधीत आहे. ७३व्या घटनादुरूस्ती नुसार त्रीस्तरीय पंचायत राज व्यवस्था आहे. त्याच्या अंमलबजावणीची एकदम खालच्या पातळीवरची सत्यता मागस परभणी जिल्ह्यासाठी दलीताच्या विकासात स्थानिक स्वराज्य संस्थाची भुमिका संरक्षण विभागामार्फत एकता,सामाजिक न्याय आणि मानवी सन्मान इ.

## **Sampling Design :**

या अध्यनात परभणी जिल्ह्यातील एक तालुका घेतला आहे. त्यातील दोन ग्रामपंचायत, या दोन मध्ये अनुसुचीत जातीच्या लोकांची संख्या ही जास्त आहे. याशिवाय सर्व अनुसुचीत जातचे निवडुन दिलेले लोकप्रतीनिधी,पचायत सचीच,सराकरी अधीकारी,मानव अधिकाराच्या संघटना,गैर शासकीय संघटना चे सहकार्य घेण्यात येत आहे.

## **Data Collection and Analysis :**

या अध्ययनातील तथ्य संकलन खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे. संशोधन पध्दती व नमुना निवड,निवउक उतरदात्याकडुन गुणात्मक, संख्यात्मक या दोन्ही पध्दतीने प्राथमिक तथ्य संकलन करण्यात आलेले आहे. दुय्यम तथ्य संकलनात

मुलाखत अनुसुची तयार करण्यात आली यात, राजकीय प्रश्न,सहभागाचे स्वरूप, स्थानिका शक्तीच संरक्षता, नेतृत्वाचा दर्जा, विकास योजनाची नियोजन, दलीत सक्षमीकरणाची पध्दतीचा अभाव सरकारी योजनामध्ये इ. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्रशासन समजुन घेत असताना मानवाधिकाराचा दृष्टीकोन समोर ठेवण्यात आला आहे. या संशोधनात ैचै या पॅकेजचा उपयोग करण्यात आला आहे.

**निष्कर्ष :—**

१) स्थानिक शासनामध्ये दलीतांना काही प्रामाणात आपल्या मानव अधिकाराचा वापर करता येत आहे.

२) स्थानिक शासनामध्ये दलीत उमेदवारांचे प्रमाण वाढलेले आहे.

३) ग्रामपंचायत स्तरावर दलितांच्या मानव अधिकारांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन होत आहे.

४) जिल्हा परिषद, पंचायत समीती व ग्रामपंचायत त्यात दलितांवर होणाऱ्या आत्याचार याबाबत कोणतेही यशस्वी पाउल उचलेले दिसुन येत नाही.

५) स्थानिक स्वराजय संस्थेमध्ये दलीत महिलांच्या सहभागात वाढ झालेली आहे.

६) जिल्हा परिषद, पंचायत समीती व ग्रामपंचायत या स्तरावर दलीत महिला सदस्यांचे प्रमाण जास्त दिसत आहे. परंतु तेथे त्यांच्या मानव आधिकारांचे उल्लंघन होत आहे.

७) परभणी जिल्हा हा मागास असल्यामुळे येथिल स्थानिक शासनातील दलीतांना आपले मानव अधिकार काय आहेत व त्याचा उपयोग कोठे व केव्हा करावयाचा यांची माहिती नाही.

८) जिल्हा परिषद, पंचायत समीती व ग्रामपंचायत यांच्या मार्फत दलीतांच्या मानवाधिकारांचा जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन केलेले दिसत नाही.

९) दलीत उमेदवारांवर उच्चवर्णीय उमेदवारांचे वर्चस्व असलेले परभणी जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेत दिसून आले.

१०) स्थानिक शासनामध्ये मानव अधिकार व त्यांच्या अंमलबजावणी बाबत उदासीनता दिसुन आली आहे.

सुचना : —

१) परभणी जिल्ह्यातील स्थानिक शासनात दलीतांच्या मानव अधिकारांविषयी प्रसार व प्रचार मोहीम राबवावी.

२) जिल्हा परिषद, पंचायत समीती व ग्रामपंचायत येथिल जनपगतिनिधींना मानव अधिकारांचे प्रशिक्षण दयावे.

३) दलीत उमेदवारांना त्यांच्या मानव अधिकाराविषयी प्रशिक्षण दयावे.

४) जिल्हा परिषद, पंचायत समीती व ग्रामपंचायत येथे मानव अधिकार समन्वय केंद्रे स्थापन करावी.

५) स्थानिक शासनामध्ये ज्या दलीत महीला उमेदवार आहेत त्यांना त्यांच्या मानव अधिकाराची माहिती करून दयावी.

६) दलीत महिलांनी आपल्या मानव अधिकारांचे उल्लंघन झाल्यास त्या विरोधात आवाज उठवायला पाहीजे.

७) स्थानिक शासनामध्ये दलीतांच्या मानव अधिकाराचे जर कोणी उल्लंघन केले असेल तर त्यांना शिक्षा करावी.

८) भारतीय राज्यघटनेने दिलेले मुलभुत अधिकार तसेच मानव अधिकार यांचा दलीतांना भरपुर उपयोग झाला पाहीजे.

९) संयुक्त राष्ट्र संघटनेने जे जगाला मानव अधिकार दिलेले आहेत. ते दलीतांनासुध्दा मानव या नात्यांने प्राप्त झालेले आहेत.

१०) स्थानिक शासनाच्या प्रशासनात मानव अधिकार विभाग सुरू करावा.

## संदर्भ ग्रंथ सुची:


१) प्रा.के .आर.बंग — भारतीय प्रशासन, (जून २००४).

२) अरूणकुमार पीलई —भारत का राष्ट्रीय मानव अधिकार गठन: कार्य और भावी परिदृष्य.

३) प्रा. किसन चोपडे — राजकीय सिध्दांताची तत्वे (ऑगस्ट २००२).

४) डॉ. जनार्दन वाघमारे— साकाजिक न्याय: सकल्पना आणि सिध्दी

५) प्रा. नागोराव कुंभार — न्याय म्हणजे काय.

६) प्रा. लक्ष्मण कोत्तापल्ले — सामाजिक प्रशासन.

७) प्रा. बी.बी. पाटील आणि प्रा.उर्मिला चव्हाण — राजकीय सिध्दांताची मुलतत्वे (ऑगस्ट २००३).

८)	डॉ.बी.आर.जोशी—भारतीय संविधानातील मुल्यव्यवस्था : एक चिकीत्सा.

९)	प्रा. रा.ज. लोटे — भारतीय राज्य व शासनव्यवस्था.

१०)	डॉ. हरीशकुमार — गांधी सामाजिक, राजनैतिक परिवर्तन.

११)	कृष्णा इंगळे — सामाजिक न्याय आणि आरक्षण लोकराज्य (आक्टो.२००६).

१२)	डॉ. भालचंद्र मुणगेकर — आर्थीक विकास आणि सामाजिक न्याय, लोकराज्य (आक्टो. २००६).

१३)	मुंशीलाल गौतम:कायदा व सामाजिक न्याय  लोकराज्य (आक्टो.२००६)

१४)	डॉ. यशवंत मनोहर — धम्म म्हणजे भारतीय संविधानाचे प्राणतत्व  लोकराज्य (आक्टो.२००६.

१५)	वर्तमान पत्रे: १) सम्राट २) सामना ३) लोकमत ४) सकाळ  ५) लोकसत्ता.

१६)	प्रा. शेख हाशम, डॉ. जोगेंद्र गवई — राजकिय सिध्दांत.

**<u>English References :-</u>**

1)	Crook R.C. Manor,1998, Democreacy and Decentralisation in South Asia and West Africa, Cambridge University Press.

2)	Deshpande S.V. and G.B.V. Murthy,2002 ‘Decentralised Governance in Karnatka, Economic and Political Weekly, 4 may Mumbai.

3)	GhatakM. 2002 Recet Reforms in the Panchayat System in West Bangal. Towards Greater Participatory Governance. Economic and political weekly 5 January, Mumbai.

4)	Harris J. 2001, Social Captital Construction and the Conslidation of Civil Society in Rural Areas Destin Working Paper, No-00-16 , Development Studies Institutes London School of Economics.

5)	Mathew G.2001. Maharshtras Gram Sevak Raj , The Hindu, August-13.

6)	Nambiar,M. 2001 Making The Gramsabha work, Economic and Political Weekly. 18 August,Mumbai.

7)	Proyan M. 2009, Human Rights, Gender and the Enviornment, Longman Delhi.